FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

0154131

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला. प्र. वि., पहिली खबर क्र. FIR No. 23, वर्ष Year 2021, दिनांक Date 22/05/2021

2. (i) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (ii) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम 1988, कलमे Sections 7
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day शुक्रवार, तारीख पासून Date from 08/05/2021 वेळ Time 13:00, तारीख पर्यंत Date to 21/05/2021 वेळ Time 19:15

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 20/05/2021, वेळ Time 17:00

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 10/2021, तारीख Date 22/05/2021 वेळ Time 09:15

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P. S. 8 कि. मि. उत्तर-पूर्व, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. धारावी

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name धारावी पोलीस ठाणे, ठिकाणाचे नंबर No. if any ........, गल्ली Ward ........, रस्त्याचे नाव Name of road 90 फिट रोड

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name संदेश बागुल
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name मधुकर बागुल
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 47 वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. 9326725144
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........, दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address सर्वेश टॉवर, सि विंग, 6 वा मजला, फ्लॅट क्र. 604, गल्ली / सर्व्हे नं. Ward ........, घर / नाव नं. House/Name No. ........, फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........, पॅन नं. PAN No. ........, वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road टागोर नगर, ग्रुप क्र. 03, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village विक्रोळी (पू.), पोस्ट Post मुंबई-400083, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........, सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   (1) अमोल पोपट गाडे, वय 27 वर्षे, धंदा-नोकरी (पो. उप निरीक्षक) धारावी पो. ठाणे, मुंबई.
   रा. ठी: रूम नं. 1112, 11 वा मजला, स्वदेशी मिल्स म्हाडा कॉलनी, चुनाभट्टी, मुंबई

   (2) प्रभाकर दशरथ जोशी, वय 44 वर्षे, धंदा-नोकरी (सहा. पो. निरीक्षक) धारावी पो. ठाणे.
   रा. ठी: सी/402, पोलीस अधिकारी वसाहत,
   सिद्धार्थनगर, एल बी एस रोड, घाटकोपर, मुंबई.

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

आतील फिर्यादी संदेश मधुकर बागूल, वय 31 वर्षे. रा. डी. सर्वोदय टॉवर, 'डि' विंग, 6वा मजला, फ्लॅट क्रं 604, टागोर नगर, ग्रुप क्रं 03, विक्रोळि (पू) मुंबई-400083 यांचा स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेला जबाब हिच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(शैलेश चव्हाण)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

(संदेश मधुकर बागूल)

फिर्याद दि. २२/०५/२०२१

मी, संदेश मधूकर बागुल, वय ४७ वर्षे, धंदा–खाजगी बांधकाम कॉन्ट्रॅक्टर, राहाणार सर्वोदय टॉवर, सी–विंग, सहावा माळा, रुम नं. ६०४, टागोरनगर, ग्रुप नं.३, विक्रोळी(पुर्व), मुंबई ४०००८३, मोबाईल क्र. ९३२६७२५१४४, .८४६४८४६७२४,

—XX—

मी वरील प्रमाणे असुन वर नमुद ठिकाणी माझे कुटुंबियांसह गेल्या दोन महीन्यापासुन भाडेतत्वावर राहत आहे. मी खाजगी बांधकाम कॉन्ट्रॅक्टर म्हणुन माझा मित्र अरविंद सिंग उर्फ ठाकुर राहाणार चेंबुर कॅम्प याचे सोबत पार्टनरशिप मध्ये काम करतो. मागील महीन्यात मला चेंबुर येथील एका खाजगी इमारतीचे डेब्रीज उचलण्याचे काम मला मिळाले होते. त्याकामाकरीता लागणारे कामगारांना राहाण्यासाठी खोली पहाण्यासाठी मी दि. २७/०४/२०२१ रोजी धारावीमध्ये राहाणारा माझा मित्र गोपी नाडर याचेसोबत गेलो होतो. रात्री ११.०० वा.चे दरम्यान आम्ही दोघे ओला गाडीतुन धारावी पोलीस ठाण्याचे समोरुन जात असताना रस्त्याचे मध्ये दोन ट्रक उभे असल्याने ट्रॅफिक जाम झाल्याने माझा मित्र गोपी नाडर हा गाडीतून उतरुन त्या ट्रक चालकांशी बोलत असताना त्यांचेमध्ये बाचाबाची झाल्याने धारावी पोलीस ठाण्याचे एक पोलीस कर्मचारी त्याठिकाणी आले व त्यांनी माझा मित्र गोपी नाडर यास धक्काबुक्की करीत पोलीस ठाण्यात घेवून गेले. म्हणुन मी गाडीतुन उतरुन काय झाले हे पहाण्यासाठी पोलीस ठाण्यात गेलो असता माझा मित्र गोपी नाडर यास पोलीस काठीने मारहाण करीत होते. त्यावेळी मी पोलीसांना गोपी नाडर यास मारण्याचे कारण विचारले असता पोलीसांनी मला शिवीगाळ करुन काठीने मारण्यास सुरुवात केली. त्यानंतर आमचे दोघांविरुध्द पोलीसांनी सरकारी कामात अडथळा करुन मारहाण केल्याबाबत धारावी पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ३००/२०२१ क. ३५३, ३३२, ३२३,५०४,५०६,३४ भा.द.वि. सह ३७ (१)(३), १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा दाखल केला.

त्यानंतर वर नमुद गुन्हयात अटक करण्यासाठी पोलीसांनी आमची अंगझडती घेतली त्यावेळेस माझे अंगझडतीत माझे पॅन्टचे पुढील उजव्या खिशातील पाकीटामध्ये रोख रक्कम रु. ४०,०००/– तसेच माझा विवो कंपनीचा मोबाईल फोन ज्यामध्ये जिओ कंपनीचे सिम क्रमांक ९३२६७२५१४४, घडयाळ, चष्मा, मनगटी कडे व रुमाल या वस्तु काढुन घेतल्या व त्यानंतर मला अटक करण्यात आली.

दि. ०८/०५/२०२१ रोजी मला कोवीड–१९ ची लस देण्यासाठी माहिम लॉकअप मधुन धारावी येथील म्युनसिपल शाळेत हवालदार खोत व इतर पोलीस घेवून आले. त्याठिकाणी माझ्या विरुध्द नोंद असलेल्या गुन्हयाचे तपासि अधिकारी पी.एस.आय. अमोल गाडे मला भेटले व बोलले की, 'माझे काहीतरी कर, मी तुझे बेलचे बघतो, तुझ्या भावाला किंवा वकीलाला मला भेटायला सांग' असे बोलुन पैशांची मागणी केली. त्यानंतर मी लस घेतल्यानंतर काहीवेळाने हवालदार खोत यांनी त्यांचे मोबाईल फोनवरुन पी. एस.आय. अमोल गाडे यांना त्यांचे मोबाईल फोनवर फोन लावुन माझे अंगझडतीतील पैशाबाबत बोलणी केली व तुमचे पैसे काढुन घेवून राहिलेले पैसे त्याला परत करा असे बोलून फोन माझेकडे दिला. त्यावेळेस पी.एस.आय. अमोल गाडे यांनी माझे अंगझडतीत मिळालेली रोख रक्कम व इतर वस्तु परत करण्यासाठी माझेकडे रु. १५,०००/– रक्कमेची मागणी करुन ते न दिल्यास तुझ्या सर्व वस्तु व पैसे जमा करतो असे बोलले.

दि. १९/०५/२०२१ रोजी मला मा. न्यायालयातुन जामीन मिळाल्याने मी जेलमधुन बाहेर आलो. मला वरील पोलीसांना लाच दयावयाची नसल्याने मी त्यांचेविरुध्द मा. अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचेकडे दि. २०/०५/२०२१ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता येवून लेखी तक्रार अर्ज केला. मी दिलेल्या तक्रार अर्जावर कारवाई करण्याकरीता पो.नि. शैलेंद्र चव्हाण यांची नेमणुक करण्यात आली. त्यानंतर पो.नि. शैलेंद्र चव्हाण यांनी माझेकडे तक्रारीबाबत सविस्तर चौकशी करुन पुढील कारवाई करण्याकरीता मला दि. २१/०५/२०२१ रोजी सकाळी १०.००वा. ला.प्र.वि. कार्यालयात येण्याबाबत सुचना दिली.

दि. २१/०५/२०२१ रोजी सकाळी १०.०० वा. मी ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात हजर राहीलो त्यावेळेस पो.नि. शैलेंद्र चव्हाण यांनी माझी स.पो.आ. आबासाहेब पाटील व दोन सरकारी पंचांशी ओळख करुन दिली. व मी दिलेला तक्रार अर्ज पंचांना वाचावयास देवून त्यावर त्यांची स्वाक्षरी घेण्यात आली. त्यानंतर पो.नि.शैलेंद्र चव्हाण व स.पो.आ. पाटील यांनी मला दिलेल्या सुचनेनुसार लोकसेवक यांचे कार्यालयात जावून त्यांची प्रत्यक्ष भेट घेवून त्यांच्याशी चर्चा करावयाची आहे असे सांगितले. त्यावेळी मला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात येणार असल्याचे सांगितले आणि त्यामध्ये माझे व लोकसेवक यांच्यात होणारे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रित करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी माझेकडे लाचेची मागणी करीत असल्याचे निष्पन्न झाल्यास त्या अनुषंगाने पुढील सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगितले होते.

त्यानुसार पो.नि.शैलेंद्र चव्हाण, सपोआ पाटील, पंच व मी असे लाचलुचपत प्रतिबंधक मुंबई विभागाचे गोपनीय कक्षात गेलो. त्याठिकाणी पो.नि..शैलेंद्र चव्हाण यांनी प्रथम डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर पंचासमक्ष फॉरमॅट करून तो चालू करुन त्यामध्ये कोणतेही पूर्व संभाषण नसल्याची खात्री करुन घेवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये प्रथम माझे पो.नि.शैलेंद्र चव्हाण व पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यांनतर पो.नि.शैलेंद्र चव्हाण व सपोआ पाटील व पथक असे लाप्रवि. कार्यालयातून पोलीस वाहनाने लोकसेवक यांचे कार्यालयात पडताळणीकरीता रवाना झालो. लोकसेवक कार्यरत असलेल्या धारावी पोलीस ठाण्याचे थोडया अंतरावर पोलीस वाहन थांबविले. पो.नि.शैलेंद्र चव्हाण व सपोआ पाटील यांनी मला व पंचाना पडताळणी कारवाई वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझे शर्टाचे आतील बनियनला व्हाईस रेकॉर्डर लावून तो चालू करुन लोकसेवकाची भेट घेण्याकरीता पंच क्र.१ श्री. विलास रामदास काकडे यांचेसोबत मला पाठविण्यात आले. सदरवेळी मी लोकसेवक यांचे धारावी पोलीस ठाणे येथे गेलो व पोलीस ठाण्यामधील पहील्या माळयावरील अधिकारी कक्षात पी.एस.आय. गाडे यांची भेट घेतली. व माझे विरुध्द दाखल गुन्हयाचे वेळी अंगझडतीमध्ये जमा केलेल्या वस्तु व रोख रक्कमेबाबत विचारले असता त्यांनी स्वत:चे कपाटातून माझा विवो कंपनीचा मोबाईल फोन, मनगटी घडयाळ, मगनगटी कडे, चष्मा व रिकामे पाकीट दिले. त्यानंतर मी माझे रोख रक्कमेबाबत विचारले असता पी.एस.आय.गाडे मला बोलले की, अंगझडतीमध्ये केवळ रु. ३०,०००/– मिळाले होते त्यावेळी मी त्यांना रु. ४०,०००/– होते असे सांगितले असता त्यांनी नकार दर्शविला. व वरील रु. ३०,०००/– रक्कमेपैकी मला रु. १५,०००/– रोख दिले व उर्वरीत रु. १५,०००/– स्वत:कडे ठेवले त्यावेळी मी पी.एस.आय. गाडे यांना रु. १५,०००/– रक्कम जास्त होते असे सांगितले असता ते मला बोलले की, मी दिलेले रु. १५,०००/– परत कर, सर्व रक्कम मी सरकार जमा करतो. त्यामुळे मी त्यांना काहीही बोललो नाही.

त्यानंतर पी.एस.आय. गाडे हे मला पोलीस ठाण्यातील तडीपार कक्षात घेवून गेले व तेथे बसलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रभाकर जोशी यांचेसमोर हजर केले. त्यावेळी स.पो.नि. जोशी मला बोलले की, 'सदरची केस ही गंभीर स्वरुपाची असुन तुला दोन वर्षासाठी तडीपार करतो. तसेच आता तुझा कोर्टातून जामीन झाला आहे, परंतु इकडे तुझा लवकर जामीन होणार नाही. त्यासाठी मी काहीतरी मार्ग काढतो. परंतु माझी परीस्थीती चांगली नाही अशी कारणे मला सांगु नको. व मला पुन्हा येवून भेट'. असे बोलून मला दि. २५/०५/२०२१ रोजी दु. १२.०० वा. प्रतिबंधक कारवाई करीता हजर रहाण्याची नोटीस व स्वत:चा मोबाईल क्र. ८१०८५८८९५५ असा लिहीला व सदरची नोटीस मला देवून त्यांचे कार्यालयाकडील स्थळ प्रतीवर माझी स्वाक्षरी घेतली. व फोन करुन येण्यास सांगितले.

त्यानंतर मी व पंच असे धारावी पोलीस ठाणे येथून निघून सरकारी वाहनाजवळ आलो त्याठिकाणी पो.नि. शैलेंद्र चव्हाण यांनी माझेजवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन आम्हाला हकीगत विचारली व माझेत व लोकसेवक यांच्यात झालेले संभाषण ऐकले त्यावेळी पी.एस.आय. गाडे यांनी माझ्याकडे रु. १५,०००/– लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच स.पो.नि. जोशी यांनी मला प्रतिबंधक

कारवाईची नोटीस देवून फोन करुन येण्याबाबत सांगितल्याने पो.नि. चव्हाण व स.पो.आ. पाटील यांनी चर्चा करुन पडताळणी करण्याचे ठरविले. त्यानंतर काही वेळाने मी पो.नि. शैलेंद्र चव्हाण यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे माझे मोबाईल फोनचा स्पीकर ऑन करुन स.पो.नि. प्रभाकर जोशी यांना फोन केला असता त्यांनी काहीएक बोलण्यास नकार दिला. सदरचा कॉल रेकॉर्ड करण्यात आला. त्यानंतर पो.नि. शैलेंद्र चव्हाण यांनी मला लोकसेवक स.पोनि. प्रभाकर जोशी यांची त्यांच्या कार्यालयात जावून प्रत्यक्ष भेट घेवून चर्चा करावी असे सांगुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो माझे बनियनला आतील बाजुस लावुन मी व सरकारी पंच क्र.१ असे लोकसेवक स.पो.नि.जोशी यांची भेट घेण्याकरीता धारावी पोलीस ठाणे येथील तडीपार कक्षात गेलो असता माझ्यावर करण्यात येणाऱ्या प्रतिबंधक कारवाई मध्ये मदत करण्यासाठी माझ्याजवळील मोबाईलवर १५००० असा अंक टाईप करुन मला दाखविला त्यावेळेस मी त्यांना रु. १५,०००/– जास्त होतात असे बोललो असता त्यांनी मला त्यांचे कक्षाचे बाहेर काढले. त्यानंतर पुन्हा मला त्यांनी आत बोलावुन माझ्या मोबाईलवर १२००० असा अंक टाईप केला. त्यावर मी त्यांना हाताचे बोटांचा इशारा करुन रु. १०,०००/– देतो असे सांगितले. त्यावर त्यांनी आमचे पेपर घेवून संध्याकाळी ०८.०० वा. पर्यंत येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र.१ असे पोलीस ठाण्यातून निघुन सरकारी वाहनाजवळ आलो. त्याठिकाणी पो.नि. शैलेंद्र चव्हाण यांनी माझेजवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन आम्हाला हकीगत विचारली व माझेत व लोकसेवक यांच्यात झालेले संभाषण ऐकले त्यावेळी स.पो. नि. जोशी यांनी माझ्याकडे रु. १२,०००/– लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर मी पो.नि. शैलेद्र चव्हाण व स.पो.आ. आबासाहेब पाटील यांनी सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत मला, पंचाना तसेच सापळा पथकास सुचना दिल्या. दिलेल्या सुचनेप्रमाणे लोकसेवक याने मागणी केलेली लाचेची रक्कम त्यास दयावयाची असल्याने मी माझे बचतीतून आणलेली रु. १०,०००/– रक्कम ( रु. ५००/– दराच्या भारतीय चलनी २० नोटा ) पो.नि. शैलेंद्र चव्हाण यांचेकडे दिले. त्यानंतर पो.नि.शैलेंद्र चव्हाण यांनी पोलीस वाहनावरील पोलीस चालक किशोर भोसले यांचेमार्फत रु. १०,०००/–रक्कमेस पंचासमक्ष अॅन्थ्रासिन पावडर कापसाच्या बोळयाने लावली. सदरहु नोटा पोलीस चालक भोसले यांनी पंचासमक्ष त्यांचे हाताने माझे शर्टाचे पुढील डाव्या खिशात ठेवल्या. त्यानंतर माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून लावून पंचासोबत पाठविण्यात आले. मी व पंच क्र.१ असे धारावी पोलीस ठाणे येथे जावुन तडीपार कक्षातील स.पो.नि. जोशी यांना जावून भेटलो. त्यावेळी त्यांनी मला तुम्ही चहा पिवून या तुम्हाला नोटीस दयायची आहे असे बोलून तुमच्या बऱ्याच ठिकाणी साईट चालु आहेत, हा बराच मोठा माणुस आहे असे बोलले. त्यानंतर मी पोलीस ठाण्याचे बाहेर जावुन सापळा पथकास लोकसेवकाने लाच स्विकारली नसल्याचा इशारा केला. त्यानंतर पो.नि. शैलेंद्र चव्हाण यांनी रस्त्याच्या बाजुला उभ्या असलेल्या चारचाकी गाडीच्या आडोशाला उभे राहुन माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर मी सर्व हकीगत पो.नि. शैलेंद्र चव्हाण यांना सांगितली. तसेच पो.नि. शैलेद्र चव्हाण व स.पो.आ. पाटील यांनी माझे व लोकसेवक स.पो. नि. जोशी यांचेतील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रित झालेले संभाषण ऐकले.

त्यानंतर पुन्हा थोडयावेळाने लोकसेवक स.पो.नि.जोशी यांना भेटायला जावयाचे असल्याने पो.नि. शैलंद्र चव्हाण यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे बनियनला आतील बाजुस लावला. त्यानंतर मी लोकसेवक यांना भेटण्यासाठी त्यांचे कक्षात गेलो असता जोशी साहेब यांनी मला त्यांचे कक्षात बसण्यास सांगितले व स्वत:बाहेर आले व रायटर यास आत मध्ये पाठविले. तेव्हा मी रायटर यांना साहेबांचे पेपर आणले आहेत असे सांगितले असता त्यांनी त्यांचेकडील एक खाकी रंगाचा लिफाफा देवून यात टाकुन दे असे सांगितले. त्यानंतर मी माझेकडील लाचेची रक्कम सदर लिफाफ्यामध्ये टाकून कोठे ठेवू असे रायटरना विचारले असता त्यांनी हाताने इशारा करुन टेबलावर ठेवलेल्या आंब्याच्या पेटीखाली ठेवण्यास सांगितले त्यानंतर मी रायटर यांना त्यांचे नांव विचारले असता त्यांनी सुर्यवंशी असे सांगितले. व पोलीस

ठाण्यातुन बाहेर येवून सापळा पथकास नियोजित डोक्यावर हात फिरवुन आलोसे यांनी लाच स्विकारल्याचा इशारा केला. त्यानंतर तात्काळ सापळा कारवाईतील पो.अधिकारी व पथक धारावी पोलीस ठाणे येथे पहील्यामाळयावर तडीपार कक्षात जावुन स.पो.नि. प्रभाकर जोशी यांना व पो. अधिकारी कक्षातील पी.एस. आय.गाडे यांना ताब्यात घेतले. व तडीपार कक्षात स.पो.नि. जोशी यांचे टेबलावर मी आंब्याचे पेटीखाली ठेवलेला लिफापा दोन्ही सरकारी पंचासमक्ष सापळा पथकास दाखविला त्यानंतर पो.नि. शैलेंद्र चव्हाण यांचे सुचनेप्रमाणे पंच. क्र.२ पिंपळे यांनी लिफापा आंब्याच्या पेटीखालुन काढुन तो उघडुन त्यातील रक्कम पाहीली असता रु. १०,०००/– असल्याची खात्री करुन रक्कम व लिफापा ताब्यात घेतला. त्यानंतर स. पो.नि. जोशी यांचे सुरक्षेकामी दोन पो. कर्मचाऱ्याची नेमणुक करुन सापळा पथक हे पोलीस अधिकारी कक्षात जावुन पी.एस.आय. गाडे यांचेकडे माझे अंगझडतीमधील काढुन घेतलेल्या रु. १५,०००/– रक्कमेबाबत विचारपुस केली असता त्यांनी बाजुलाच असलेल्या अधिकारी विश्राम कक्षात असलेल्या त्यांच्या सॅकमध्ये असल्याचे सांगितले. त्यानुसार सापळा पथक व पंच यांचेसह पी.एस.आय. गाडे यांना घेवून अधिकारी विश्राम कक्षत गेले असता त्यांनी राखाडी व काळया रंगाचे सॅक दाखविली तेव्हा पो.नि. शैलेंद्र चव्हाण यांचे सुचनेप्रमाणे सदरची सॅक पंच क्र.२ पिंपळे यांनी उघडली असता सॅकच्या आतील कप्प्यामध्ये रोख रक्कम रु. १४,०००/–( भारतीय चलनाच्या रु. २०००/– दराच्या ३ व रु. ५००/– दराच्या १६ नोटा ) मिळुन आल्या त्या पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आल्या.

आलोसे १) पी.एस.आय. अमोल गाडे व २) स.पो.नि. प्रभाकर जोशी यांचेशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत.

तरी दिनांक २१/०५/२०२० रोजी केलेल्या पडताळणीत व सापळा कारवाईत माझ्यावर दाखल असलेल्या गुन्हयात अटक करताना घेतलेल्या अंगझडतीत मिळुन आलेली रोख रक्कम व इतर वस्तु परत देण्यासाठी पी.एस.आय. अमोल गाडे यांनी रु. १५,०००/– ची मागणी करुन अंगझडतीत मिळुन आलेल्या रक्कमेतील रु. १५,०००/– स्वत:साठी काढुन घेतले तसेच स.पो.नि. प्रभाकर जोशी यांनी माझेवर करण्यात येणारी प्रतिबंधक कारवाईत मदत करण्यासाठी व तडीपार न करण्यासाठी रु. १२,०००/– रक्कमेची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रु. १०,०००/– लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडले म्हणून माझी पी.एस.आय. अमोल गाडे व स.पो.नि. प्रभाकर जोशी यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद असून कारवाई होणेस विनंती आहे.

माझी फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मी वाचुन पाहीली असता मी सांगितले प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

( शैलेंद्र चव्हाण )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ………… तात्काळ
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.
………… —

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ………… —
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक …………
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील बानूस, नमूद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचेवर दाखल असलेल्या गुन्ह्यात
अटक करण्यापूर्वी घेतलेल्या अंगझडतीत मिळून आलेली मोबा. व रक्कम व इतर वस्तू परत
देण्यासाठी आलोसे क्र. 01 यांने रुपये 15,000/- रु ची लाचेची मागणी करुन जमा
असलेल्या रक्कमेतून रु 15000/- काढून घेतले. तसेच आलोसे क्र. 02 यांनी
फिर्यादीवर करण्यात येणाऱ्या प्रतिबंधक कारवाईत मदत करण्यासाठी रु 20000/-
लाचेची मागणी करुन रु. 10,000/- रु रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
पो.नि. शैलेंद्र चव्हाण, ला.प्र.वि. मुंबई
2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
…………
3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन …………, जिल्हा …………, राज्य …………
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :
(1) Registered the case and took up the investigation or Directed (Name of I.O.)………… Rank………… No………… to take up the Investigation or
(2) Refused investigation due to………… (3) Transferred to P. S. …………
District………… on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name शैलेंद्र शिवराम चव्हाण
पदनाम Rank पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई
तपासिक अं. चा कोड क्रं.
Posting
Code No. of I. O. …………

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख…………
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**